Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

October-2021

## CONSEQUENCES OF BRITISH INVASION OF INDIA : NEED OF REWRITING HISTORY



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
**Dr Santosh Bansod,**
Head , Department of History
Narayanrao Rana Mahavidyalaya
Badnera, Dist. Amravati.

**Editor**
**Dr. Dheeraj Kumar Najan,**
Head , Department of History
Dr. Gopalrao Khedkar Mahavidyalaya,
Gadegaon, Telhara Dist. Akola

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

ISSUE No- 321

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

# INDEX-321



| No. | Title of the Paper<br>Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | ब्रिटिश आक्रमणाचे वऱ्हाडवरील शैक्षणिक परिणाम प्रा.डॉ. संतोष बनसोड | 1 |
| 2 | ब्रिटिशराजवटीचे भारतावरील परिणाम डॉ.उर्मिला क्षीरसागर | 4 |
| 3 | वॉरन हेस्टिंग्ज कालखंडात भारतात झालेल्या बदलाचा ऐतिहासिक आढावा (इ.स. १७७२ - १७८५) डॉ. शरद गावंडे / पंढरीनाथ पोपट शेजूळ | 8 |
| 4 | वासुदेव बळवंत फडके यांची सशस्त्र चळवळ डॉ श्रीहरी रंगनाथराव पितळे | 11 |
| 5 | भारतावरील ब्रिटीश आक्रमणाचे सांस्कृतिक जीवनावरील परिणाम प्रा. अंभोरे अशोक गंगाराम | 13 |
| 6 | भारतातील ब्रिटीश आक्रमणाचे आर्थिक जीवनावरील परिणाम प्रा.सुरेखा रामदास लगड | 16 |
| 7 | भारतावर ब्रिटिश आक्रमणाचे राजकीय जीवनावर झालेले परिणाम एक ऐतिहासिक चिंतनशील अध्ययन प्रा.डॉ. एन. आर. वर्मा | 18 |
| 8 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारी स्त्रियांचे योगदान प्रा. डॉ. किशोर शेषराव चौरे | 22 |
| 9 | भारतावरील ब्रिटीश आक्रमणाचे शैक्षणिक जीवनावर झालेले परिणाम प्रा. डॉ. शरद गावंडे /प्रा. संजय सदाशिव बनकर | 25 |
| 10 | ब्रिटिश कालीन शिक्षण पद्धतीचे भारतीयांवरील परिणाम डॉ. एस. यु. गावंडे/अमोल विश्वासराव तायडे | 28 |
| 11 | ब्रिटीश कालीन शिक्षणाचे भारतावर झालेले परिणाम डॉ. प्रमोद ना. घ्यार | 31 |
| 12 | ब्रिटीश साम्राज्यवादाविरुद्ध भारतीय राष्ट्रीय आंदोलनाची दीर्घकालीन रणनीती सहा. प्रा. डी.एन. रिठे | 37 |
| 13 | गर्व्हनर जनरल लॉर्ड डलहौसीचे खालसा धोरण एक ऐतिहासिक चिकित्सा १८४८–१८५६ श्रीकांत पांडुरंग तळेकर/डॉ.शरद गावंडे | 40 |
| 14 | बहिरम यात्रा – एक ऐतिहासिक मागोवा कु. शिल्पा युगेंद्र अंबळकार | 44 |
| 15 | भारतीय अर्थव्यवस्था पर ब्रिटिश शासन का प्रभाव... डॉ.सोमनाथ लक्ष्मण गुंजकर | 47 |
| 16 | 'भारतावरील ब्रिटिश आक्रमण, सामाजिक जीवन व भाषांतर युग' डॉ.संदीप अर्जुनराव बनसोडे | 53 |
| 17 | ब्रिटिश आक्रमणाने स्त्री जीवनातील सतिप्रथेवर झालेले परिणाम प्रा. डॉ. कुसमेंद्र गं. सोनटक्के | 56 |
| 18 | भारतावरील ब्रिटीश आक्रमणाचे स्त्री जीवनावरील परिणाम प्रा. कु. सुषमा जयकुमार फरसोले | 58 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 321(CCCXXI)
ISSN : 2278-9308
October, 2021

# भारतावरील ब्रिटिश आक्रमण, सामाजिक जीवन व भाषांतर युग

डॉ.संदीप अर्जुनराव बनसोडे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई,जि.बीड.

ब्रिटिश भारतात आले आणि त्यांनी इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी स्थापन केली या कंपनीने १७५७ ते १८५६ या कालावधीत जवळजवळ संपूर्ण भारत आपल्या ताब्यात घेतला आणि आपली सत्ता घट्ट करण्यासाठी येथे नवी दुहेरी राज्यव्यवस्था उभारली .

एकोणिसाव्या शतकात युरोपमध्ये मानवतावाद, बुद्धिवाद, लोकशाही, राष्ट्रवाद, उदारमतवाद या मूल्यांवर आधारित नवे युग साकारले होते. पाश्चिमात्य जगातील या परिवर्तनाचे पडसाद भारतातसुद्धा उमटणे स्वाभाविक होते. इंग्रजांना प्रशासन चालवण्यासाठी भारतातील समाजाची ओळख करून घ्यायची होती. त्यासाठी त्यांनी येथील परंपरा, इतिहास, साहित्य, कला, तसेच येथील संगीत, प्राणी - पक्षी यांचाही अभ्यास करावयास सुरुवात केली. १७८४ साली विल्यम जोन्स या इंग्रज अधिकाऱ्याने कोलकता येथे एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल ही संस्था स्थापन केली . मॅक्सम्युलर हा जर्मन विचारवंत भारतीय धर्म, भाषा, इतिहास यांचा गाढा अभ्यासक होता. जर एखादा व्यक्ती बाहेरून येऊन आपल्या देशाचा आपल्या समाजाचा आपल्या देशातल्या चालीरीतींचा, साहित्याचा, कलेचा आणि परंपरांचा अभ्यास करत असेल तर आपणही असे का करू नये? असे येथील तरुणांना वाटू लागले आणि म्हणून देशातील तरुण आपणही काहीतरी केले पाहिजे या प्रेरणेने शिक्षण घेऊ लागले.

दरम्यानच्या काळात इंग्रजांनी अनेक कायदे केले. १८२९ मध्ये लॉर्ड बेंटिंकने सतीबंदीचा तर १८५६ मध्ये लॉर्ड डलहौसीने विधवा पुनर्विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. हे कायदे समाजसुधारणेस भारतात पूरक ठरले. प्रशासन चालवण्यासाठी ब्रिटिशांना इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांची गरज होती. लॉर्ड मेकॉलेच्या शिफारशीनुसार १८३५ मध्ये भारतात पाश्चात्त्य शिक्षण सुरू झाले. नव्या शिक्षणाद्वारे नवे पाश्चात्त्य विचार, आधुनिक सुधारणा, विज्ञान व तंत्रज्ञानाची ओळख भारतीयांना करून देण्यात आली. १८५७ साली मुंबई, मद्रास ( चेन्नई ) व कोलकता येथे विद्यापीठांची स्थापना करण्यात आली, पाश्चात्त्य शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गाने भारतातील सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीचे नेतृत्व केले. प्रत्येकजण या – ना - त्या मार्गाने सामाजिक चळवळीत सामील होऊ लागला, इतरांना चळवळ समजावून सांगू लागला.

यामध्ये प्रामुख्याने सुशिक्षित समजला जाणारा वर्ग होता; त्या वर्गानेही मोठी भूमिका बजावल्याचे आपणास दिसून येते. साधारणत: १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला इंग्रजी राजवट सुरु झाली आणि इंग्रजांनी स्वतःच्या फायद्यासाठी म्हणून का होईना परंतु सुरू केलेल्या इंग्रजी शिक्षणामुळे महाराष्ट्रात पाश्चात्त्य संस्कृतीचा तेथील विज्ञानाचा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे साहित्याचा अभ्यास सुरू केला. व शिक्षणासाठी साहित्याची गरज निर्माण झाली. नव्याने आणि कमी कालावधी मध्ये जर साहित्याची निर्मिती करायची असेल, तर त्याला भाषांतराशिवाय पर्याय नाही हे अनेकांनी ओळखले आणि खऱ्या अर्थाने येथूनच बरेचसे वाङ्मय इंग्रजीतून भाषांतरित करण्यात आले मग या वाङ्मयात सर्वच प्रकारचे लेखन आले, ज्यामध्ये माहितीपर ग्रंथ असतील, विविध विषयाला अनुसरून लिहिलेले साहित्य असेल, किंवा शालोपयोगी लेखन असेल या सर्वांचा समावेश यात करण्यात आला, आणि खऱ्या अर्थाने उपयुक्त अशा ज्ञानाचा प्रसार करण्याचे हेच एक माध्यम त्याकाळात प्रभावी ठरले. या भाषांतराचा मुख्य उद्देशच या निमित्ताने यशस्वी झाला. भाषांतर सुरू झाले हे जरी खरे असले तरी केवळ इंग्रजीतून मराठीत भाषांतर करणे हा एवढा उद्देश लेखक मंडळींचा नव्हता, कारण ही लेखक मंडळी जाणून होती की, आपल्या देशात अनेक भाषा

बोलणारी मंडळी आहे अनेक विद्वानांची साहित्यसंपदा आहे हीच साहित्यसंपदा इंग्रजीबरोबरच मराठीत भाषांतरित होऊ लागली, मग यामध्ये संस्कृत, अरबी, उर्दू, बंगाली, मराठी, कोकणी, गुजराती, तामिळ, कन्नडा, हिंदी अशा एक ना अनेक भाषेमध्ये साहित्यसंपदा भाषांतरित होऊ लागली. याच काळात म्हणजे साधारणत: १८३१ मध्ये मोलवर्थ आणि मेजर कँडी या दोघांच्या प्रयत्नातून मराठी इंग्रजी कोशाची निर्मिती झाली. याच काळात इंग्रजांचे धोरण मराठी वाङ्मय निर्मितीस अत्यंत प्रेरक असल्याचे दिसून येते, परंतु जी सुशिक्षित अशी विचार मंथन करणारी लेखक मंडळी होती ती मंडळी इंग्रजी भाषेत सामावलेले ज्ञान पाहून इतकी दिपून गेली होती की, जास्तीत जास्त इंग्रजीचे भाषांतर मराठी आणि संस्कृत मध्ये कशा पद्धतीने होईल याचाच विचार ते करू लागले. आणि भाषांतराचा हा प्रघात वाढल्यामुळे या काळालाच 'भाषांतर युग' असेही संबोधले गेले, हे भाषांतर युग म्हणजे महाराष्ट्रातील बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थितीचा अपरिहार्य अशा प्रकारचा परिणाम होता याच भाषांतर युगामुळे इंग्रजीतील साहित्याचा त्यातील विविध साहित्य प्रकारांची साहित्यामध्ये असलेल्या विविध विषयाची आपल्याला ओळख झाली आणि यातूनच पुढे खऱ्या अर्थाने मराठी साहित्य सुद्धा बहराला आले असे म्हणता येईल. कारण आतापर्यंत मराठी साहित्यामध्ये असलेले अनेक साहित्य प्रकारातील ग्रंथ इतर भाषेत पाहिजे त्या प्रमाणात भाषांतरित झालेले नव्हते.

साधारणतः १८५१ मध्ये स्थापन झालेल्या दक्षिणा प्राइज कमिटीचे कार्य अतिशय उल्लेखनीय आहे असे आपल्याला म्हणता येईल १८६९ साली या कमिटीने प्रत्यक्ष साहित्य निर्मितीला प्रेरणा देण्यास सुरुवात केल्याचे दिसते. कमिटीने अनेक बक्षिसे जाहीर करून काही विषयांवर लेख मागविले यातूनच म.मो. कुंटे यांचे 'राजा शिवाजी' हे काव्य असेल किंवा कुरुंदवाडकर यांचे 'गंगावर्णन' हे साहित्य असेल याची ओळख सर्व जगताला झाली याच काळात संस्कृतातील अनेक उत्कृष्ट नाटके तसेच शेक्सपियरची अनेक दर्जेदार नाटके मराठीमध्ये भाषांतरीत झाली आणि यातूनच पुढे रंगभूमीचा उत्कर्ष झाल्याचे दिसते.

एकीकडे साहित्य निर्मिती आणि दुसरीकडे समाज प्रबोधन या काळात मोठ्या प्रमाणात होत गेले, याच काळात म्हणजे साधारणत: १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांचे दर्पण व दिग्दर्शन ही दोन मासिक सुरू केली गेली, या नियतकालिकांनी मराठी साहित्यात आपली फार मोठी भूमिका पार पाडली यानंतर १८४० मध्ये प्रभाकर, १८४८ ते ५९ च्या दरम्यान 'लोकहितवादींची शतपत्रे' प्रसिद्ध झाली, आणि दु:खी समाजाला, परंपरेने आणि रूढीने गस्त समाजाला खडबडून जागे करण्याचे काम या शतपत्रांमधून लोकहितवादींनी केले. मुख्यत्वे हिंदू धर्मात असलेल्या अनिष्ट रूढी या रूढींवर अतिशय कडाडून असा प्रहार करताना आपल्याच धर्मातील दोष समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. खरेतर असे म्हणता येईल की नियतकालिकांची निर्मिती ही ज्ञानलालसा निर्माण करणारी एक महत्वपूर्ण अशी सांस्कृतिक घटना होती. पुढील काळात 'विविध ज्ञानविस्तार' असेल की, 'मनोरंजन' या नियतकालिकांनी साहित्याच्या क्षेत्रात अतिशय मोलाचे कार्य केल्याचे दिसून येते. व यातूनच खऱ्या अर्थाने मराठी कथा, कादंबरी, काव्य, नाटक या सर्वच वाङ्मय प्रकारांना मोठ्या प्रमाणात मागणी सामान्य जनमानसातून होऊ लागल्याचे दिसून येते.

या काळात इंग्रजी राजवट सोबतच इंग्रजी शिक्षण आणि याच सोबत आधुनिक विद्या, कला आणि सर्वात महत्वाचे म्हणजे विज्ञान या सर्वांसोबत पाश्चात्य संस्कृतीची मूल्य सुद्धा भारतात स्वीकारली जाऊ लागली स्वातंत्र्य समता आणि बंधुता ही मूल्ये लोकांना परिचित झाली. अंधश्रद्धा अज्ञान दूर केल्यासच माणसाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो हा विचार लोकांना पटला आणि त्याचे पडसादही संपूर्ण महाराष्ट्रभर दिसू लागले, जातिभेदाविरुद्ध प्रार्थना समाजाचे कार्य असेल मूर्तिपूजा विरुद्ध जनमत घडवण्याचा प्रयत्न त्यांनी केला तर सत्यशोधक समाज मात्र स्पृश्य - अस्पृश्य भेदांवर आणि असलेल्या अज्ञानावर महात्मा फुले यांच्या नेतृत्वामध्ये टीका करत होते आणि

म्हणूनच या काळातले कर्ते सुधारक म्हणून महात्मा ज्योतिबा फुले यांच्याकडे पाहिले जाते त्यांनी वर्णव्यवस्थेवर तर हल्ला चढवलाच सोबतच आपल्या पाचवीला पुजलेले दारिद्र्य नेमके कशामुळे आपला पिच्छा सोडत नाही? यासंबंधीचे विचार त्यांनी जनसामान्यात पेरले. मजुरांच्या, अस्पृश्यांच्या आणि शेतकऱ्यांच्या दुःखांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी मोठ्या खुबीने आपल्या लेखनात 'ब्राह्मणांचे कसब', 'शेतकऱ्याचा असुड' 'गुलामगिरी' किंवा 'तृतीय रत्न' सारखे नाटक लिहून केले शिक्षणाचे महत्त्व जाणून स्वतःच्या पत्नीला स्त्री शिक्षणासाठी प्रवृत्त करून पहिली मुलींची शाळा काढण्याचे धाडस निर्माण केले. हा सर्व बदल हा एकाएकी येणारा नव्हता, मात्र या सर्व बदलाला कुठेतरी ब्रिटिशांच्या काळात होत असलेला अन्याय अत्याचार हाच कारणीभूत होता आणि या अन्याय अत्याचाराला विरोध म्हणून हा बदल सर्वसामान्यांनी विचारवंतांनी आपापल्यापरीने स्वीकारला व या देशातील सामाजिकतेमध्ये असेल किंवा साहित्यामध्ये असेल अशा एक ना अनेक घटकांमध्ये वेगळा विचार मांडून स्वतःबद्दल स्वीकारून इतरांनाही तो स्वीकारण्यास भाग पाडले. यातूनच खऱ्या अर्थाने ब्रिटिशांना विरोध करण्यासाठी म्हणून आपण स्वतः शिकले पाहिजे ही भावना या निमित्ताने प्रत्येकाच्या मनात रुजली असल्याचे दिसून येते.

संदर्भ ग्रंथ सूची

१) प्र. के. अत्रे व कृ. पा. कुलकर्णी (संपा) महागाष्ट्र पाथा – भागी प्रकाशन – मुंबई
२) रा. के. लेले - मराठी वृत्तपत्रांचा इतिहास-प्रकाशक-कॉन्टिनेन्टल, पुणे
३) वि. गो. खोबरेकर - महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८- ८४)- म. रा.सा. आ. सं. मंडळ, मुंबई, १९९४ |
४) ग.बा. सरदार - महात्मा फुले-प्रकाशक - ग्रंथाली, द्वितीय आवृत्ती १९८२महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाची वाटचाल - प्रकाशक - नवनिर्माण न्यास दौड, १९८६ त
६) सरदार ग.बा. - रानडेप्रणित सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसारणेची तत्त्वमीमांसा - विद्यापीठ १९९७: सु प्रकाशक-पुणे
७) कुमार केतकर - कथा स्वातंत्र्याची प्रकाशक .म.रा.पा.वि. व अ सं. मं.पुणे २००३
८) पु.ग. सहस्त्रबुद्धे - महाराष्ट्र संस्कृती - कॉन्टिनेन्टल